38/2019 2018-19 MR

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

# INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATIONS RESEARCH JOURNEY INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL
24 APRIL 2019
SPECIAL ISSUE 182 (H)

NCCLIST - 2019

Smt. Sindhutai Jadhav Maha Mehkar 330


## National Conference
on
## Contemporary Innovations in Library and Information Science, Social Science and Technology for Virtual World (NCCLIST-2019)

Contemporary Innovation in Language & Literature

Guest Editor
**Dr. Nilesh N. Gawande**
Principal,
Late B.S. Arts, Prof. N.G. Science & A.G. Commerce College,
Sakharkherda, Tq. Sindkhed Raja Dist. Buldana

Executive Editor
**Mr. Prakash S. Kolhe**
Librarian,
Late B.S. Arts, Prof. N.G. Science & A.G. Commerce College,
Sakharkherda, Tq. Sindkhed Raja Dist. Buldana

Chief Editor
**Dr. Dhanraj T. Dhangar**
Yeola, Dist. Nashik (MS), India



SWATIDHAN PUBLICATIONS

99

Scanned by TapScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 182(H) Contemporary Innovation
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

# संयुक्त महाराष्ट्र चळवळी आणि नागपूर करार

**प्रा. डॉ. एम. आर. शिंदे**
श्रीमती सिंधुताई जाधव कला
व विज्ञान महाविद्यालय ,मेहकर
मो. क्र. ९८९०१९३३१५

**प्रस्तावना :-**

ब्रिटिशांनी आपल्या राज्यकारभारसाठी भारताची विभागणी वेगवेगळया प्रांतात केली होती. परंतु ती भाषेप्रमाणे नव्हती इ.स.१९२० रोजी नागपुरमध्ये झालेल्या कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळी भाषावार प्रांतरचनेचा मुदद्। महात्मा गांधीनी मान्य केला होता. लोकमान्य टिळक सुध्दा भाषावार प्रांतरचनेच्या बाजुने होते. कॉंग्रसेने ऐकेकाळी मान्य केलेला हा मुदद्। स्वातंत्र्यानंतर मात्र या पक्षाला विशेषतः नेहरुंना संकुचित किंवा राष्ट्रहितासाठी. धोक्याचा वाटू लागला .त्यामुळे मुंबईचा समावेश महाराष्ट्रात करण्यासाठी त्यांचा कडाडून विरोध होता.

**१.संयुक्त महाराष्ट्राची चळवळ :-**

स्वातंत्र्य लढयात भाषावार राज्य निर्माण करण्याचे कॉंग्रसचे धोरण होते. परंतु स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने त्याची अमलबजावणी झाली नाही. मुंबई प्रांतात गुजराती व कन्नड भाषीक प्रदेश समाविष्ट होते. विदर्भाचा काही भाग मध्य प्रांतात, तर मराठवाडा विभाग हैदराबाद संस्थानात होता. या सर्व मराठी भाषीक प्रदेशांचे एक राज्य व्हावे यासाठी १९४७ नंतरच्या काळात प्रदिर्घ लढा झाला. सर्व मराठी भाषीक प्रदेशाचे म्हणजे मुंबई प्रांत , मध्यप्रांत व हैदराबाद संस्थानातील मराठी भाषीक प्रदेश व गोमंतक या सर्वाचे मिळून एक राज्य निर्माण करण्यासाठी २८ जूलै १९४६ रोजी मुंबईत भरलेल्या ^महाराष्ट्र एकीकरण परिषदेने* एक ठरावे मंजूर केला. संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यासाठी सातत्याने प्रयत्न व्हावेत यासाठी महाराष्ट्र कॉंग्रसचे ज्येष्ठ नेते शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली ^संयुक्त महाराष्ट्र परिषद* या सर्वपक्षीय संघटनेची स्थापना करण्यात आली. मराठी भाषिकांचे राज्य व्हावे यासाठी विचारवंत साहित्यिक,आणि राजकीय पुढाऱ्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच महाराष्ट्राची मागणी सातत्याने केलेली आह.

**२.भारतीय राज्यघटना व भाषावार प्रांतरचना :-**

भारतीय घटना परिषदेत भाषावार प्रांतरचनेचा मुद्दा कॉंग्रेसच्या नेत्यांनी उपकस्थत केला. मात्र नेहरुपटेल -आझादया कॉंग्रसच्या नेत्यांचा भाषिक प्रांतरचनेला विरोध होता. परंतु भाषावार प्रांतरचनेचा विचार होण्यासाठी आयोग नेमावा यासाठी केंद्रीय नेतृत्वावर दबाव वाढत गेला. परिणामी केंद्रशासनाला भाषावार प्रांतरचना आयोग. नेमावा लागला.संविधान समितीने १७ जून १९४८ रोजी श्री.एस.के. दार यांचे नेतृत्वाखाली ६ ^भाषिक राज्य समिती* स्थापण केली. दार कमिशनने १० डिसेंबर १९४८ रोजी आपला अहवाल सादर केला.

**३.दार कमिशन व जे.व्ही.पी.कमिटी:-**

इ.स.१९४८ मध्ये प्रसिध्द झालेल्या दार कमिशनच्या अहवालात भाषावार प्रांतरचनेला विरोध दर्शविण्यात आला होता. व महाराष्ट्रीयन लोकांबदद्ल अपमानास्पद टिप्पणी त्यामध्ये होती. जे.व्ही.पी.कमिटीने महाराष्ट्र व कर्नाटकच्या मागणीला पाठिंबा दिला नाही व मुंबई महाराष्ट्रास देण्यास विरोध केला. कारण मुंबई शहर अनेक भाषांच्या व वर्णाच्या लोकांची असून उद्योगधंदाचे शहर आहे. असे अहवालात म्हटले. तर वल्लभभाई पटेल यांनी मुंबईचा विकास गुजराती भाषिकांनी केला असे नमुद केले.

330
Smt. Sindhutai Jadhav Maha Mehkar



Scanned by TapScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 182(H) Contemporary Innovation
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
April-2019

वळवले. द्वैभाषिकची विभागणी करतांना महाराष्ट्र राज्याने गुजरात राज्याला १० कोटी द्यायचे व पुढील ४ वर्षात ती रक्कम कमी करत आणायची अशी अट मान्य झाली. तसेच मुंबईचा विकास व उभारणी गुजराती भांडवलदारांनी केली असा दावा गुजराती भाषिक करीत होते व त्याचे व्याज म्हणून एकुण ५० कोटी देऊन मुंबई महाराष्ट्राला मिळाली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना. झाली तरी त्यात बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, व डांगचा समावेश झाला नाही. बेळगावचा, महाराष्ट्र, कर्नाटक, सिमावाद, अद्यापही मिटला नाही. नेहरुंना राज्यासाठी हवे असणारे मुंबई हे नाव वगळुन समितीने घ्महाराष्ट्रड असे नाव ठरवले .महाराष्ट्र राज्याची स्थापना कामगार दिनी १ मे १९६० रोजी केली. महाराष्ट्र स्थापनेचा कलश पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे हस्ते आणला गेला. नव्या महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई व नागपूर उपराजधानी निश्चत झाली.

**नागपूर करार :-**

२० व्या शतकाच्या सुरवातीला इंग्रज राजवटीत विदर्भ हा तत्कालीन सेंट्रल प्रोव्हन्स अॅन्ड बेरार या प्रांताचा एक भाग होता. या प्रांतात तत्कालीन गोंडवन आणि वऱ्हाडातील ८ जिल्हे तसेच आजचा मध्यप्रदेश आणि छत्तीसगडचे काही जिल्हे असा विस्तीर्ण प्रदेश समाविष्ट झाला होता. या प्रदेशात गोंडवन आणि वऱ्हाड हे मराठी भाषिक प्रदेश होते.तर उर्वरित भाग हिंदी भाषिक प्रदेश होता . त्यामुळे या मध्यप्रांतातील मराठी भाषिक प्रदेश वेगळा काढून विदर्भ या नावाचे स्वतंत्र राज्य करावे असा प्रस्ताव १९०५ मधील कॉग्रेस अधिवेशनात सर्वप्रथम ठेवण्यात आला. त्यानंतर १९२० मध्ये पुन्हा हा प्रस्ताव समोर आणला गेला. १ ऑक्टोबर १९३८ मध्ये सेंट्रल प्रोव्हन्स अॅन्ड बेरारच्या विधानसभेने वेगळे विदर्भ राज्य केले जावे असा प्रस्ताव एकमताने पारित केला.

याच दरम्यान मुंबईसह सर्व मराठी भाषिकांचे एकच राज्य व्हावे असा प्रस्ताव पुढे आला . यासाठी घ्संयुक्त महराष्ट्र समितीड अखंड महाराष्ट्र समिती यासारख्या विविध संघटनांच्या पुढाकाराने संयुक्त महाराष्ट्रासाठीचा लढा सुरु झाला.त्या काळात महाराष्ट्र आणि विदर्भ अशी मराठी भाषिकांची दोन राज्ये बनवावी असा एक मतप्रवाह होता. तर या दोन्ही राज्यांना एकत्र करुन महाराष्ट्र हे एकसंघ राज्य बनवावे असा दुसरा मतप्रवाह होता. या मुद्यांवर बराच संघर्ष उभा झाला होता.

संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी झालेला हा संघर्ष टाळण्यासाठी आधी अकोला करार आणि नंतर नागपूर करार असे दोन करार करण्यात आले. महाराष्ट्र, नागपूर आणि वऱ्हाड भागातील मराठी भाषिक नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्राचा पाठपुरावा करण्याच्या उदेद्‌शाने ८ ऑगष्ट १९४७ रोजी घ्अकोला करारड केला तर घ्नागपूर करारड हा १९५३ मध्ये झाला. अकोला करारानुसार विदर्भ आणि महाराष्ट्र ही दोन राज्ये आणि एकच राज्यपाल अशी तरतुद झाली होती ही महाराष्ट्रवाद्यांना मान्य नव्हती. डिसेंबर १९५३ मध्ये फजल अली यांचे अध्यक्षतेखाली राज्यपुर्नरचना आयोगाची नियुक्ती झाली. या आयोगाचा कल विदर्भाचे वेगळे राज्य देण्याकडे होता. या पार्श्वभूमीवर अखंड महाराष्ट्रवादी नेत्यांनी विदर्भवादी नेत्यांशी हातमिळवणी करुन एक नवा करार केला . २८ सप्टेंबर १९५३ रोजी झालेला हा प्रसिध्द करार घ्नागपूर करारड म्हणून ओळखला
जातो. हा समग्र अकरा कलमी करार होता.

**नागपूर करारातील तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :-**

१. भारतातील सर्व राज्यांची पुर्नरचना करण्याच्या प्रश्नावर अहवाल देण्यासाठी एक उच्चाधिकार समिती नेमन्यात येत असल्यामुळे मराठी भाषिक प्रदेशाच्या विविध भागामध्ये राहणारे आम्ही लोक अशी विभागाचे मिळून एका स्वतंत्र राज्याची निर्मिती करण्यासाठी आधारभूत म्हणून पुढील निर्णय मान्य केले आहेत.
२. सध्याचा मुंबई. मध्यप्रदेश आणि हैद्राबाद यामधील मराठी भाषिक असलेल्या प्रदेशाचे मिळून बनलेले राज्य असावे, या राज्याच्या हदद्दीमध्ये इतर राज्यांच्या प्रदेशांचा समावेश असता कामा नये. या राज्याला महाराष्ट्र किंवा मराठी प्रदेश असे म्हटले जाईल आणि मुंबई त्याची राजधानी राहील.



53

Scanned by TapScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 182(H) Contemporary Innovation | April-2019
UGC Approved Journal

३. सर्व प्रकाराचा विकास व प्रशासन यांच्या प्रयोजनासाठी हे राज्य महाविदर्भ मराठवाडा आणि उर्वरीत राज्य हें तीन घटक मिळून बनलेले असेल.

४. एक स्वतंत्र राज्य म्हणून त्या राज्याच्या ज्या गरजा असतील त्यांना बाधा न येता निरनिराळया घटकासाठी करावयाच्या खर्चासाठी पैशाचे वाटप त्या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात यावे. परंतु मराठवाडयाची अविकसित कस्थर्ता लक्षात घेता. त्या प्रदेशाच्या सर्वांगिण विकासाठी खास लक्ष पुरविण्यात यावे. आणि दरवर्षी विधानसभे समोर तसा अहवाल सादर करावा.

५. सरकार बनवितांना या घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळावे

६. व्यावसायिक प्रशिक्षण आणि वैज्ञानिक पेशासंबंधी मिळणाऱ्या सुविधा जेथे आहेत अशा सर्व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी या घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात चांगल्या आणि पुरेशा सोयी मिळतील अशी खात्रीलायक तरतूद करण्यात यावी.

७. नविन राज्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायपीठ मुंबई येथे असेल. व दुसरे खंडपीठ नागपूर येथे असेल.नागपूर येथील खंडपीठ सर्वसाधारणपणे महाविदर्भ प्रदेशाचे कामकाज पाहिल. उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्या नेमणूका करण्यासाठी शिफारशी करतांना महाविदर्भाच्या सेवेमधील आणि वकील वर्गामधील व्याक्तींची शिफारशी करु न य प्रदेशाला प्रनिनिधीत्व मिळेल अशी व्यवस्था करावी अशा शिफारसी मराठवाडा प्रदेशालाही लागू असेल.

८. शासनाकडील व शासननियंत्रित उपक्रनामधील सर्व श्रेणीतील नोकर भर्तीच्या वेळी संबंधित घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात यावे.

९. महाविदर्भाच्या लोकांना नागपूर शहराशी फार जुन्या काळापासून घनिष्ट संबंध आहे. आणि त्या अनुषंगाने त्यांना विविध फायदेही मिळतात याची आम्हाला जाणीव आहे. एक संघ राज्याचे प्रशासन परिणामकारकरितीने चालण्याच्या दृष्टीने आवश्यक ते निर्बध पाहूनही त्यांचे फायदे मर्यादेपर्यत टिकविण्याची आम्हाला इच्छा आहे. त्यांच्या सल्ल्याने या कलमांच्या अमलबजाणीसाठी आवश्यक त्या उपयोजना करण्यात येतील. शासनाचे कार्यस्थान अधिकृतपणे निक्श्चत कालावधीसाठी नागपूर येथे हलविण्यात येईल आणि दरवर्षी राज्य विधिमंडळाचे किमान एक अधिवेशन नागपूर येथे घेण्यात येईल.

१०. अद्ययावत जनगणनेच्या अधारे खेडे हा घटक माणून जिल्हयाच्य हद्दी मधील अशा पध्दतीने फेरबदल करण्यात येतील की, त्यामध्ये नविन राज्यातोल सर्व सलग मराठीभाषिक क्षेत्रांचा त्यात अंतर्भाव होईल.

**संदर्भ सुची :-**

1. Basu Dr. Durga Das Introduction to the CONSTITUTION of INDIA (Limited ) publisher: LesisNexis 21 st edition,2014
2. Basu Dr. Durga Das Introduction to the Constitution of India (Limited publisher: LesisNexis 22nd edition, reprint 2015
3. Bakshi P.M.The Constitution of India (Pocket Edition) Universal Law publishing 13th edition, reprint 2016
4. Basu, Dr. Durga Das revised by S.R.Roy & S.P.Sen Gupta Indian CONSTITUTIONAL Law 3rd edition, 2011
5. Bakshi jP,M. The Constitution of India Universal law publishing 13th edition, 2015

६. आऊटलाईन्स, ऑफ इंडियन लिगल हिस्टी,एम.पी.जै,वधवा अँड कंपनी,नागपूर.

७. बसु डी.डी.कमेंटरो ऑफ द कॉकस्टट्युश न ऑफ इंडिया,प्रकाशन प्रेटिंग हाल,खंड५

८. बाली एल.आर.डॉ.आंबेडकर और भारतीय संविधान ,भीन पत्रिका पब्लकेशन.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana